RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - २ ] मंगळवार, जानेवारी ५, २०२१ / पौष १५, शके १९४२ [ पृष्ठे ५

## असाधारण क्रमांक १

## प्राधिकृत प्रकाशन

**विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांजकडून**

वाचा.-- (१) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक नपसु-२००१/सीआर-१-५, दिनांक १ जानेवारी २००१.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१४/प्र. क्र. १५/का.-६, दिनांक २२ मे २०१५.

(३) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे यांचेकडील आदेश क्रमांक नपाप्र/१/कावि/१७७/२०१६, दिनांक १२ मे २०१६.

(४) मा. उपसचिव, नगर विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमयूएन-२०१६/प्र.क्र. ४११/नवि-१८, दिनांक ७ सप्टेंबर २०२० अन्वये अधिसूचना प्रसिद्ध दिनांक ७ सप्टेंबर २०२०.

(५) जिल्हाधिकारी, सातारा यांचा प्रस्ताव क्रमांक साशा/नपा/४०२६/२०२०, दिनांक ३० डिसेंबर २०२०.

*आदेश*

क्रमांक नपाप्र-१/कावि-६३६/२०२०.--ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ *(२)* मधील तरतुदीन्वये, नागरिकांचा मागास प्रवर्ग व आरक्षणासह राखून ठेवावयाच्या महिला सदस्य संख्या, तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाची एकूण सदस्य संख्या सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार निश्चित केलेली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७४ चे पोट-कलम *(२)* व *(३)* च्या परंतुकान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नगरपरिषदा/नगरपंचायतीची सदस्य संख्या निश्चित करण्याचे अधिकार प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना वाचामधील संदर्भ क्रमांक १ येथील आदेशान्वये प्रदान केले आहेत. संदर्भ क्रमांक ३ नुसार सातारा नगरपरिषदेच्या ४० सदस्य संख्येबाबत राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते. परंतु संदर्भ क्रमांक ४ नुसार नगर विकास विभागाने सातारा नगरपरिषदेची हद्दवाढ करणेबाबत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. सबब संदर्भ क्रमांक ५ अन्वये जिल्हाधिकारी, सातारा यांनी सातारा नगरपरिषद हद्दवाढ क्षेत्राची सदस्य संख्या निश्चित करणेबाबत अहवाल सादर केला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ *(२)* व संदर्भ क्रमांक १ येथील आदेशानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे, सातारा नगरपरिषद हद्दवाढ क्षेत्रातील सदस्य संख्या ७ सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित केली आहे.

परिशिष्ट "अ"

जिल्हा सातारा

| अ.क्र. | नगरपरिषदेचे नाव | निवडून द्यावयाची सदस्य संख्या | राखून ठेवलेल्या जागांची संख्या | | | | रकाना ७ पैकी महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागेची विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जाती-साठी | अनुसूचित जमाती-साठी | नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी | महिला | अनुसूचित जाती-साठी (रकाना ४ पैकी) | अनुसूचित जमाती-साठी (रकाना ५ पैकी) | नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (रकाना ६ पैकी) | सर्वसाधारण महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सातारा (सन २०१६ च्या सार्वत्रिक निवडणूक क्षेत्राकरिता). | ४० | ५ | ० | ११ | २० | ३ | ० | ६ | ११ |
| | नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमयूएन-२०१६/प्र. क्र. ४११/ नवि-१८, दिनांक ७ सप्टेंबर २०२० अन्वये अधिसूचना दिनांक ७ सप्टेंबर २०२० नुसार हद्दवाढ क्षेत्राकरिता. | ७ | १ | ० | २ | ४ | ० | ० | १ | ३ |
| | हद्दवाढीचे नंतर सातारा नगरपरिषदेचे एकूण क्षेत्राकरिता. | ४७ | ६ | ० | १३ | २४ | ३ | ० | ७ | १४ |

**टीप.--** आरक्षण निश्चित करताना एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण निश्चित करणेत आले आहे. त्यामुळे हद्दवाढ क्षेत्रासाठी अनुसूचित जाती प्रवर्गात १ पद अनुज्ञेय होत आहे. सदर आरक्षित पदासह एकूण ६ पदे अ. जा. प्रवर्गासाठी अनुज्ञेय होतात. त्यानुसार महिलांसाठी राखीव ५० टक्के प्रमाणे ३ पदे अनुज्ञेय होत असून ती यापूर्वी देणेत आली असलेमुळे हद्दवाढ क्षेत्रासाठी अ. जा. च्या महिलांसाठी पद अनुज्ञेय होत नाही.

**सौरभ राव,**

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,

नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे.

पुणे, ४ जानेवारी २०२१.

---

**BY DIVISIONAL COMMISSIONER AND REGIONAL DIRECTOR,**

**MUNICIPAL ADMINISTRATION, PUNE DIVISION, PUNE**

**Read.--** (1) Order No. Napasu-2001/C. R. -1-5, dated 1st January 2001 of Director, Municipal Admin., Mumbai.

(2) State Election Commission, Maharashtra State, Mumbai, Order No. RNA/NP-2014/CR-15/ Dask-6, dated 22nd May 2015.

(3) Order of Regional Director, Municipal Admn. and Divisional Commissioner, Pune Division, Pune No. NPA/1/WS/177/2016, dated 12th May 2016.

(4) Deputy Secretary, Urban Development Department to Government G.R. No. MUN-2016/ CR-411/UD-18, dated 7th September 2020 and Notification, dated 7th September 2020.

(5) Collector, Satara proposal No. SASHA/NAPA/4026/2020, dated 30th December 2020.

## *Order*

No NPA-1/WS/636/2020.--In exercise of the powers under Section 9 *(2)* of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 after taking into consideration the population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Other Backward Class of Citizens), the number of Councillors to be elected and the number of seats to be reserved for Women (including the seats belonging to SC/ST/BC of Citizens) and the number of seats to be reserved for SC/ST/BC of Citizen are to be fixed.

In exercise of the powers conferred by the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965, Section 74 *(2)* and *(3)* the Director, Municipal Administration has delegated the powers to fix the number of seats in respect of Municipal Councils *vide* its letter mentioned at reference No. 1 above. By reference No. 3, 40 councillors were fixed for Satara Municipal Council. But by reference No. 4 Urban Development Department has published a notification for altering the limits of Satara Municipal Council. Hence the Collector, Satara as per reference No. 5 has submitted the report for fixing the number of seats.

Now, Therefore, in exercise of the powers mentioned in sub-section *(2)* of Section 9 of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965, the Regional Director of Municipal Administration, Pune Division, Pune, hereby fixes the number of seats as 7 for the extended area of Satara Municipal Council as shown in Annexure "A".

**BY REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER, PUNE DIVISION, PUNE**

**ANNEXURE "A"**

**District Satara**

| Sr. No. | Name of Municipal Council | Total Number of Councillors to be elected | No. of Seats reserved for S. C. | S. T. | Backward Class of Citizens | Women | Out of Col. 7 seats reserved for Women S.C. (out of col. 4) | S.T. (out of col. 5) | Backward Class of Citizens (out of col. 6) | General Women |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | Satara (for area of 2016 General Election) | 40 | 5 | 0 | 11 | 20 | 3 | 0 | 6 | 11 |
| | Notification regarding extension of area vide Government Urban Development Department G. R. No. MUN-2016/C.R. 411/UD-18, dated 7th September 2020. | 7 | 1 | 0 | 2 | 4 | 0 | 0 | 1 | 3 |
| | For total area of Satara Municipal Council after extension of area. | 47 | 6 | 0 | 13 | 24 | 3 | 0 | 7 | 14 |

**Note–** Reservation is fixed considering the proportion to the total population. Hence 1 seat gets reserved for the Schedule Caste category for the extended area of Satara Municipal Council. Total 6 posts including this reserved post are admissible for Schedule Caste category. According to 50 per cent reservation for women, 3 seats are admissible for women and they were already allotted earlier.

Hence, there won't be any seat for women belonging to the Schedule Caste category for the extended area of Satara Municipal Council.

**SAURABH RAO,**
Divisional Commissioner and
Regional Director, Municipal
Administration, Pune Division, Pune.

Pune, 4th January 2021.

---

## जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचा :** (१) मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांचेकडील पत्र क्रमांक सानप/सभा कामकाज वि./२४/२०२०, दिनांक २९ डिसेंबर २०२०.

(२) पीठासन अधिकारी तथा जिल्हा प्रशासन अधिकारी, सातारा यांचेकडील दिनांक २९ डिसेंबर २०२० रोजीच्या विशेष सभेचे इतिवृत्तांत.

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २० *(१)*.

(४) महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायती नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत नियम, २०१० मधील मुद्दा क्रमांक ६.

### आदेश

क्रमांक साशा/नपा/(सातारा न. प. स्वीकृत सदस्य निवडणूक)/३७/२०२१.--ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील सातारा नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदांच्या निवडीबाबत दिनांक २९ डिसेंबर २०२० रोजी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये स्वीकृत सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २० *(१)* व महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायत नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत नियम, २०१० मधील मुद्दा क्रमांक ६ अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम २० *(१)* व महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायत नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत नियम, २०१० मधील मुद्दा क्रमांक ६ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, शेखर सिंह, जिल्हाधिकारी, सातारा, नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांचे नाव खालीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

### परिशिष्ट

| अ. क्र. | नगरपरिषदेचे नाव | निवडून आलेल्या सदस्याचे नाव | निवड झालेल्या पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सातारा नगरपरिषद, सातारा | श्री. शशांक प्रभाकर ढेकणे | स्वीकृत सदस्य |

**शेखर सिंह,**
जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, ४ जानेवारी २०२१.

---

**वाचा :** (१) पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा, रहिमतपूर नगरपरिषद, रहिमतपूर यांचकडील पत्र क्रमांक नपा/सभा कामकाज/११४०/२०२०, दिनांक २९ डिसेंबर २०२०.

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(अ), (४)*.

### आदेश

क्रमांक साशा/नपा/(रहिमतपूर न. प. उपा. निवडणूक)/३९/२०२१.--ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदाच्या निवडीबाबत दिनांक २९ डिसेंबर २०२० रोजी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये उपाध्यक्ष पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(अ), (४)* अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(अ) (४)* नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, शेखर सिंह, जिल्हाधिकारी, रहिमतपूर नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव खालीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगरपरिषदेचे नाव | निवडून आलेल्या सदस्याचे नाव | निवड झालेल्या पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रहिमतपूर नगरपरिषद, रहिमतपूर | सौ. सुरेखा विनायक माने | उपाध्यक्ष |

**शेखर सिंह,**

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, ४ जानेवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.